# विशेष शाखा मिरा-भाईंदर,वसई- विरार

# पोलीस आयुक्तालय

## विशेष शाखा

टेबल क्रः- १२ | पेपर कात्रण | दिनांक :- ०४/१२/२०२२

------------------oooooo-------------------

विशेष शाखा मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय

१) मा. पोलीस आयुक्त यांचा शेराः-

२) मा. अपर पोलीस आयुक्त यांचा शेराः-

३) मा. पोलीस उप आयुक्त ( मुख्यालय) यांचा शेराः-

CS CamScanner

# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक ०४/१२/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०४/१२/२०२२ | सकाळ पु. पान क्र. १ | महामार्ग परीसर कोंडीमुक्त | काशिमीरा | |
| २. | ०४/१२/२०२२ | लोकमत पान क्र. ५ | मृतदेहाच्या तुकड्यांसाठी चायनीज चॉपर | माणिकपुर / दिल्ली | |
| ३. | ०४/१२/२०२२ | पुढारी पान क्र. ४ | अल्पवयीन मुलीवर अत्याचार आरोपीला १० वर्षाच्या कारावासाची शिक्षा | विरार | |
| ४. | ०४/१२/२०२२ | लोकमत पान क्र. ५ | राज्यपाल त्रिवेदींची तात्काळ हकालपट्टी करा | इतर | |
| ५. | ०४/१२/२०२२ | सकाळ पु. पान क्र. १ | वसईवासीयांचे पासपोर्टसाठीचे हेलपाटे थांबणार | वसई विरार | |
| ६. | ०४/१२/२०२२ | पुढारी पान क्र. १ | सोलापुरात बांधणार आता कन्नड भवन | इतर | |
| ७. | ०४/१२/२०२२ | पुण्यनगरी पान क्र. ९ | हर हर महादेव टीव्हीवर दाखवल्यास गंभीर परीणाम | इतर | |
| ८. | ०४/१२/२०२२ | सकाळ पु. पान क्र. १ | मॅरेथॉनची आवड असलेला धावपटु | मि.भा.व.वि. | |

CamScanner

1) सकाळ पु. पान क्र. 1

दि. 04/12/2022

# महामार्ग परिसर 'कोंडीमुक्त'

## वर्सोवा खाडीवरील तिसरा पूल नव्या वर्षात वाहतुकीसाठी सुरू

भाईंदर, ता. ३ (बातमीदार) : वाहनांची सर्वाधिक वर्दळ असलेल्या मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वर्सोवा येथील नव्या वसई खाडी पुलाचे काम पूर्ण होत आले आहे. पुढील वर्षी फेब्रुवारी अखेरपर्यंत मुंबई ते सुरत या चार मार्गिका वाहनांसाठी खुल्या होणार आहेत; तर मे अखेरपर्यंत पूल पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहे. वाहनचालकांना नव्या वर्षात ही भेट मिळणार आहे. त्यामुळे सध्या वर्सोवा येथे होत असलेल्या वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सध्या वर्सोवा येथे दोन खाडी पूल आहेत, परंतु मुंबईहून वसईच्या दिशेने जाण्यासाठी असलेला पूल जुना झाला असून तो कम्कुवत झाला आहे. या पुलाची अधूनमधून सातत्याने दुरुस्तीदेखील होत असते. यासाठी खाडीवर नवीन पूल बांधण्याचे काम सुरू आहे. जानेवारी २०१८ मध्ये पुलाचे भूमिपूजन करण्यात आले होते, पण विविध परवानग्या मिळण्यासाठी झालेला विलंब तसेच दोन वर्षे सुरू असलेले कोविड लॉकडाऊन यामुळे पुलाचे बांधकाम पूर्ण होण्यास उशीर झाला आहे; मात्र आता या पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून पुढील वर्षी फेब्रुवारी महिन्यात पुलाच्या मुंबई ते सुरत अशा चार मार्गिका वाहनांसाठी खुल्या होणार आहेत; तर सुरत ते मुंबई या चार मार्गिका मे अखेरपर्यंत सुरू होणार आहेत. खासदार राजन विचारे यांनी नुकतीच या पुलाच्या कामाची पाहणी केली. येत्या २० फेब्रुवारीपर्यंत पुलाच्या चार मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या होतील, असे आश्वासन महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आले.

### असा आहे पूल

पुलाची लांबी
**१७० मीटर**

एकूण मार्ग
**२.२५ किमी**

### वाहनांचे क्रॉसिंग बंद

मात्र नव्या पुलाची रचना अशा पद्धतीने करण्यात आली आहे, की मुंबईहून अहमदाबादच्या व ठाण्याच्या दिशेने जाणारी वाहने, अहमदाबादहून मुंबई व ठाण्याच्या दिशेने जाणारी वाहने तसेच ठाण्याहून मुंबई व अहमदाबादच्या दिशेने जाणारी वाहने एकमेकांच्या समोर न येता विनाअडथळा थेट जाऊ शकणार आहेत. वाहनांचे क्रॉसिंग बंद होणार असल्यामुळे या ठिकाणच्या वाहतूक कोंडीतून कायमची सुटका होणार आहे.

### अत्यंत वर्दळीचा मार्ग

1 मुंबई-अहमदाबाद महामार्ग हा अत्यंत वर्दळीचा मार्ग असून या मार्गावरून दररोज सव्वा लाख वाहने ये-जा करत असतात. वर्सोवा नाका या ठिकाणी मुंबईहून अहमदाबादच्या दिशेने जाणाऱ्या, मुंबईहून ठाण्याच्या दिशेने जाणाऱ्या तसेच अहमदाबादहून मुंबई व ठाण्याकडे जाणाऱ्या वाहनांचे एकमेकांना क्रॉसिंग होत असते.

2 या मार्गावार अवजड वाहनांची संख्यादेखील मोठी आहे. त्यामुळे नाक्यावर मोठी वाहतूक कोंडी होत असते. तसेच सध्याचे पूल अरुंद असल्याने वाहनांच्या रांगादेखील लागत असतात. यात वाहनचालकांचे अनेक तास खर्ची पडतात.





2) लोकमत पान क्र. 5 दि. 04/12/2022

# मृतदेहाच्या तुकड्यांसाठी चायनीज चॉपर

लोकमत न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : श्रद्धा वालकर हत्या प्रकरणातील आरोपी आफताब अमीन पूनावाला याने नार्को चाचणीत हत्येशी संबंधित अनेक गुपिते उघड केली आहेत. हत्येनंतर श्रद्धाच्या मृतदेहाचे तुकडे करण्यासाठी 'चायनीज चॉपर'चा वापर केल्याचे त्याने सांगितले. त्याचबरोबर श्रद्धाच्या शरीराचे विविध तुकडे व शिर मेहरौलीच्या जंगलातच फेकून दिल्याचा खुलासाही त्याने केला.




दिल्लीतील तिहार तुरुंगात आफताबचे नार्को चाचणीनंतरचे मुलाखत सत्र झाले. सुमारे १ तास ४५ मिनिटे त्याला विविध प्रश्न विचारण्यात आले. हे सत्र वस्तुत: न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेत होणार होते.

## मुंबई पोलिसांनी कठोरपणे चौकशी केली असती तर...

- श्रद्धाच्या वडिलांनी तक्रार दिल्यानंतर मुंबई पोलिसांनी जुजबी चौकशी करून आफताबला सोडून दिले.
- मुंबई पोलिसांनी कठोरपणे चौकशी केली असती तर श्रद्धाचे शिर, शरीराचे काही भाग आरोपीच्या फ्रीजमध्येच सापडले असते. दिल्लीला परतल्यानंतर त्याने त्यांची विल्हेवाट लावली, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

3) पुढारी पान क्र. 4

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## आरोपीला १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

विरार पोलीस ठाणे हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला न्यायालयाने १० वर्षे व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विरार पोलीस ठाणे हद्दीमध्ये ३ फेब्रुवारी २०१६ रोजी दुपारच्या सुमारास एका ७ वर्षाच्या मुलीवर शेजारीच राहणा-या आरोपी भरतकुमार झा वय ४७ वर्षे याने अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. या घटनेबाबत अल्पवयीन मुलीच्या आईने ७ फेब्रुवारी २०१६ रोजी तक्रार दिल्याने विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचे तत्कालीन तपास अधिकारी सपोनि अरविंद कांबळे यांनी आरोपीस तत्काळ अटक करून व सबळ पुरावे हस्तगत करून जिल्हा व सत्र न्यायालय, वसई येथे दोषारोपपत्र दाखल केले होते.


न्यायालयाने आरोपीस १० वर्षे कारावास व ५ हजार रुपये दंड (दंड न भरल्यास एक महिना साधा कारावास) अशी शिक्षा सुनावली आहे. या गुन्ह्याच्या सुनावणीसाठी सरकारी वकील म्हणून जयप्रकाश पाटील यांनी कामकाज पाहिले असून पैरवी अधिकारी पोउपनि मोहिते व कोर्ट अंमलदार म्हणून सहापोउपनी जयराम राऊत यांनी कामकाज पाहिले.

CamScanner

4) लोकमत पान क्र. 5

दि. 04/12/2022

5) सकाळ पू. पान क्र. 1



उदयनराजे भोसले यांनी शनिवारी रायगड किल्ल्यावर शिवसन्मान आंदोलन पुकारले होते.

# राज्यपाल, त्रिवेदींची तत्काळ हकालपट्टी करा

## उदयनराजेंची मागणी : आंदोलनाचा इशारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**महाड :** छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपमानास्पद भाष्य करणारे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांची तातडीने हकालपट्टी केली पाहिजे; अन्यथा आझाद मैदानावर आंदोलन केले जाईल, असा निर्वाणीचा इशारा उदयनराजे भोसले यांनी शनिवारी रायगड किल्ल्यावरून केंद्र सरकार व भाजपला दिला.

शिवाजी महाराजांबाबत अपमानास्पद वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ त्यांनी शनिवारी किल्ल्यावर महाराजांच्या समाधिस्थळी नतमस्तक होत शिवसन्मान आंदोलन पुकारले होते. त्यामध्ये हजारोंच्या संख्येने राज्यभरातून शिवप्रेमी सहभागी होते.

राज्यपाल व त्रिवेदी यांना हटविण्याबाबत शासन व भाजपकडून फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने उदयनराजे कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. उदयनराजे यांनी अत्यंत उद्वेगाने व आक्रमकपणे सरकारच्या भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त करीत भाजपला घरचा आहेर दिला.

### 'त्यांना' जागा दाखवा

देश विकृत लोकांच्या तावडीत गेलाय. पदावर बसलेले लोक रयतेमुळे आहेत, हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. अपमान झाल्यावर लोक गप्प बसले, नीतिमत्ता गेली कुठे? 'चूक ती चूक. पांघरूण घालणाऱ्यांना जागा दाखवायची वेळ आली आहे, अशा शब्दांत त्यांनी भाजप, केंद्र व राज्य सरकारला घरचा आहेर दिला. राज्यपालपदावरून कोश्यारींना हटवण्यासाठी पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र पाठवल्यानंतरही अद्याप कारवाई न झाल्याने तीव्र वेदना होत असल्याचे त्यांनी सांगितले.

---

त्याचबरोबर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी याविषयी केलेल्या विधानाचा तीव्र निषेध करीत आपली भूमिका स्पष्ट केली.

शिवाजी महाराजांच्या समाधीला वंदन करून राजसदरेवर काही काळ ते आपल्या कार्यकर्त्यांसह आंदोलनाला बसले. त्यानंतर त्यांनी राजसदरेवरून आपली भूमिका सविस्तर मांडताना आझाद मैदानात आंदोलनाचा इशारा सरकारला दिल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# वसईवासीयांचे पासपोर्टसाठीचे हेलपाटे थांबणार

विरार, ता. ३ (बातमीदार) : वसई तालुक्यातील नागरिकांना पासपोर्टसाठी मुंबई किंवा ठाणे येथे जावे लागत होते; परंतु आता मात्र वसईमध्येच पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र सुरू होत आहे. त्याचे उद्‌घाटन ६ डिसेंबरला होणार आहे.



वसई तालुक्यातून हजारो तरुण नोकरी, शिक्षणासाठी किंवा फिरण्यासाठी परदेशात जात असतात; परंतु वसईमध्ये पासपोर्ट कार्यालय नसल्याने त्यांना मुंबई आणि ठाण्याच्या फेऱ्या कराव्या लागत होत्या. त्यामुळे वसईमध्ये पासपोर्ट ऑफिस सुरू करावे, अशी मागणी वसईतील नागरिक आणि विविध राजकीय पक्ष गेल्या अनेक वर्षांपासून करत होते. या मागणीला आता यश आले असून ६ डिसेंबरला वसईमध्ये या कार्यालयाचे उद्‌घाटन पालघरचे खासदार राजेंद्र गावित यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रादेशिक पासपोर्ट अधिकारी डॉ. राजेंद्र गवांडे आणि पोस्ट मास्टर जनरल गणेश सावळेश्वरकर उपस्थित राहणार आहेत.

CamScanner

दि. 04/12/2022

6) पुढारी पान क्र. 1

# सोलापुरात बांधणार आता कन्नड भवन


## बोम्मईंनी महाराष्ट्राला पुन्हा डिवचले; संतप्त पडसाद

**बेळगाव : पुढारी वृत्तसेवा**

सोलापूरमध्ये दहा कोटी रुपये खर्चून भव्य कन्नड भवन बांधण्यात येईल, अशी घोषणा कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्माई यांनी करून पुन्हा एकदा महाराष्ट्राला डिवचले आहे. बोम्मई यांच्या वक्तव्याने महाराष्ट्रात संतप्त पडसाद उमटत आहेत.

बेळगाव जिल्ह्यातील रामदुर्गमध्ये विकासकामांचे भूमिपूजन शुक्रवारी त्यांच्या हस्ते झाले. त्यानंतर सायंकाळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी सोलापूर आणि केरळ राज्यातील कासरगोडमध्ये कन्नड भवन बांधण्याची घोषणा केली. ते म्हणाले, कन्नडिगांचे रक्षण करणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे. कन्नड भाषिक लोक देशात, जगात कोठेही असले तरी त्यांच्या विकासाची आणि रक्षणाची जबाबदारी आमची आहे. ती आम्ही पार पाडू. महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिराजवळ दहा कोटी रुपये खर्चून कन्नड भवन बांधण्यात येईल. यामुळे भक्तांच्या निवासाची सोय होणार आहे.

- **अक्कलकोटला भवनासाठी दहा कोटी रुपयांची तरतूद**
- **केरळातही कासरगोडला भवन उभारण्याचा इरादा**



**“ कन्नड भाषिक लोक देशात, जगात कोठेही असले तरी त्यांच्या विकासाची आणि रक्षणाची जबाबदारी आमची आहे. ती आम्ही पार पाडू.**

महाराष्ट्र, तामिळनाडू, गोवा आणि तेलंगणा राज्यांच्या सीमेला लागून असलेल्या राज्यातील जिल्ह्यांमध्ये १८०० ग्रामपंचायती विकसित करण्याची योजना राबविण्यात येत आहे. तसेच रस्त्यांच्या सुधारणेसाठी विशेष कार्यक्रम आखण्यात आला आहे. जे सीमेपलीकडे /...२

## - तर बेळगाव, बंगळुरात महाराष्ट्र भवन : संजय राऊत

**बेळगाव : पुढारी वृत्तसेवा**

कर्नाटक अक्कलकोट, कोल्हापुरात कर्नाटक उभारत असेल तर बेळगाव आणि बंगळुरातही महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी जागा द्यावी, असे शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. नाशिक येथे पत्रकारांशी बोलताना राऊत म्हणाले, महाराष्ट्राचे प्रत्येक राज्याबरोबर चांगले संबंध आहेत. गुवाहाटीवरून आल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत आसाम भवन उभारण्याची घोषणा केली. तर कर्नाटकचे मुख्यमंत्री सोलापुरात कर्नाटक भवन उभारणार असल्याचे सांगत आहेत. त्यामुळे आता महाराष्ट्राने बेळगाव, बंगळुरात महाराष्ट्र भवन उभारावे. त्यासाठी त्यांनी जागा द्यावी.

### सोलापुरात बांधणार आता कन्नड भवन

आहेत, तेही आमचेच आहेत.कारण तेथील कन्नड शाळांकडे त्या त्या राज्य सरकारने दुर्लक्ष केले आहे. पायाभूत सुविधा दिल्या नाहीत. तेथेही आम्ही मदत करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी धर्मादाय खात्याच्या मंत्री शशिकला जोल्ले, सार्वजनीक बांधकाम मंत्री सी. सी. पाटील, नगरविकास मंत्री बी. व्ही. बसवराज भैरती, खा. मंगल अंगडी आदी उपस्थित होते.

याआधी महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाने नव्याने उचल खाण्यापूर्वी मुख्यमंत्री बोम्मई यांनी पंढरपूर आणि कोल्हापूर जिल्ह्यातील कणेरी मठ येथेही कर्नाटकातून येणाऱ्या भक्तांच्या सोयीसाठी कर्नाटक भवन बांधण्याची घोषणा केली होती. शिवाय गोव्यातही कन्नड भवन बांधण्यासाठी जमीन देण्याची मागणी गोवा सरकारकडे केली होती. मात्र आता बेळगाव सीमाप्रश्नावर पुन्हा संघर्ष सुरू झाल्यानंतर मुख्यमंत्री बोम्मई यांनी सोलापूर-अक्कलकोटमध्ये कर्नाटक भवन बांधण्याचा पुन्हा उल्लेख केल्याने या घोषणेकडे महाराष्ट्राला डिवचवण्याच्या दृष्टीने बघितले जात आहे.

CamScanner

दि. 04/12/2022

7) पुण्यनगरी पान क्र. ९

# 'हर हर महादेव' टीव्हीवर दाखवल्यास गंभीर परिणाम!

## संभाजीराजे छत्रपती यांचा दूरचित्रवाणी वाहिनीला इशारा

**मुंबई :** 'हर हर महादेव' हा चित्रपट दूरचित्रवाणी वाहिनीवर प्रदर्शित करू नये. तसे झाल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा गंभीर इशारा माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी शनिवारी दिला.

'हर हर महादेव' या चित्रपटावरून सध्या वाद सुरू आहे. या चित्रपटातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास चुकीच्या पद्धतीने दाखवण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. या चित्रपटाविरोधात काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ. जितेंद्र आव्हाड यांनी ठाण्यात आंदोलनही केले होते.

आता १८ डिसेंबर रोजी हा चित्रपट झी मराठी वाहिनीवरून प्रदर्शित करण्याचा घाट घालण्यात आला आहे. त्यावरून संभाजीराजे छत्रपती यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली असून, त्यासंदर्भात झी स्टुडिओजला पाठवलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे, की 'हर हर महादेव' या चित्रपटामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाबाबत चुकीच्या पद्धतीने सादरीकरण झाले असल्याने या चित्रपटाबाबत संपूर्ण महाराष्ट्रातून संतापाची लाट उसळली होती. राज्यात अनेक ठिकाणी या चित्रपटाचे प्रदर्शन बंद पाडण्यात आले होते. या चित्रपटामुळे तमाम शिवभक्तांच्या भावना दुखावल्या गेलेल्या असतानादेखील हा वादग्रस्त चित्रपट तुम्ही झी मराठी या वाहिनीच्या माध्यमातून टेलिव्हिजनवर प्रदर्शित करत आहात.



शिवभक्तांच्या भावनांशी असा खेळ करणे योग्य नाही. सदरील चित्रपट टेलिव्हिजनवर प्रदर्शित करू नये, असे स्वराज्य संघटना सूचित करीत आहे.

या सूचनेकडे कानाडोळा करून हर हर महादेव टेलिव्हिजनवर प्रदर्शित केल्यास होणाऱ्या गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा या पत्राच्या अखेरीस संभाजीराजे छत्रपती यांनी दिला आहे.

दि. 04/12/2022

8) सकाळ पु. पान क्र. 1.




**पोलिस सेवेत तंदुरुस्ती महत्त्वाची असते, पण वाढलेले वजन कमी करण्यासाठी धावण्यास सुरुवात करणारे मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयात कार्यरत असणारे पोलिस हवालदार नितीन महाजन आज अनेक मॅरेथॉन स्पर्धांसाठी ॲम्बेसिडर बनले आहेत.**

# मॅरेथॉनची आवड असलेला धावपटू

**प्रकाश लिमये,** भाईंदर

भाईंदरमध्ये स्थायिक असलेले नितीन महाजन २००३ मध्ये पोलिस सेवेत दाखल झाले. मिरा रोड, काशीमिरा, नवघर अशा पोलिस ठाण्यांत सेवा बजावून सध्या ते मिरा रोड येथील सहाय्यक पोलिस आयुक्त कार्यालयात हवालदार या पदावर कार्यरत आहेत. मधल्या काळात त्यांचे वजन फार वाढले. त्याचा त्यांना त्रासही जाणवू लागला. डॉक्टरांनी नियमित चालण्याचा सल्ला दिला. दररोज चालण्याचा सराव करत असतानाच सहकारी शुक्ला यांच्या प्रोत्साहनामुळे ते धावण्याचा सरावही करू लागले. धावण्यामुळे वजन तर नियंत्रणात आलेच, शिवाय तंदुरुस्ती देखील वाढली. त्यामुळे त्यांच्यात धावण्याची आवडच निर्माण झाली.


नितीन महाजन
पोलिस हवालदार

याचदरम्यान मॅरेथॉनविषयी अधिक माहिती मिळत गेली. मग २०१५ मध्ये पहिल्यांदाच वसई-विरार मॅरेथॉन स्पर्धेत त्यांनी भाग घेतला. मॅरेथॉनच्या एकंदरीतच वातावरणाने ते खूपच प्रभावित झाले व मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्याचा निर्णय त्यांनी घेतला. गेल्या सात वर्षांत ते तब्बल ९१ मॅरेथॉन स्पर्धांत सहभागी झाले आहेत. यात १० किमी, २१ किमी व ४२ किमी मॅरेथॉन स्पर्धेचा समावेश आहे.


मॅरेथॉनपटू नितीन महाजन

## सहकाऱ्यांनाही प्रोत्साहन

नितीन महाजन आपल्या सहकाऱ्यांना, तसेच अन्य तरुणांनाही धावण्यासाठी व मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करत असतात. यासाठी त्यांनी स्वतःच मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत त्यांनी तीन स्पर्धा आयोजित केल्या आहेत. शिवाय रोड रनर्स हा ग्रुपही त्यांनी स्थापन केला असून त्याचे दोनशे सदस्य झाले आहेत.

## नियमितपणे योगासनाचा सराव

सुरुवातीला धावण्याचा सराव करत असताना दम लागायचा. त्यावर मात करण्यासाठी महाजन यांनी योगासने करण्यास सुरुवात केली. आता नियमितपणे ते योगासने तर करतातच, शिवाय योग शिबिराचे आयोजनही ते करत असतात.

धावण्याचा सराव आणि मॅरेथॉन स्पर्धेत भाग घेण्यामुळे व्यक्तिमत्त्वात मोठा बदल झाला. आधी माझा स्वभाव तापट होता. आता मात्र तो खूपच संयमी झाला आहे. शिवाय धावणे व योगासने यामुळे दिवसभर न थकता काम करण्याची ऊर्जा मिळते.
- नितीन महाजन, पोलिस हवालदार